नवराष्ट्र नागपूर, 14 फेब्रुवारी 2020

# RSC मध्ये रमण इनोव्हेशन महोत्सवाचा शुभारंभ

## 80 मॉडेल ठरले आकर्षणाचे केंद्र



**नागपूर.** सध्याच्या परिस्थितीत समाजाच्या प्रगतीसाठी इनोव्हेशन महत्त्वपूर्ण झाले आहे. नवीन आणि नाविन्यपूर्ण उत्पादने लोकांचे जीवनमान वाढवतात. इनोव्हेशनमुळेच व्यवसाय पद्धतीत बदल झाले आहे. जागतिकीकरण आणि स्पर्धेमुळे उत्पादनाची कार्यक्षमता आणि कार्यकुशलता वाढविण्यासाठी सतत दबाव राहत असतो. रमण विज्ञान केंद्राच्या इनोव्हेशन सेंटरच्या वार्षिक कार्यक्रमाअंतर्गत गुरुवारी रमण इनोव्हेशन महोत्सवाला सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रियदर्शीनी इंजीनियरिंग कॉलेजचे प्राचार्य विवेक नानोटी यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी अभिनव प्रकल्प स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात शाळा-महाविद्यालयातील विज्ञान व अभियांत्रिकी शाखेच्या 200 विद्यार्थ्यांनी त्यांचे 80 मॉडेल प्रस्तूत केले. तसेच स्टार्टअप अभियानाअंतर्गत विविध कारागिरांद्वारे तयार करण्यात आलेल्या अभिनव कलाकृतीही ठेवल्या जातील. महोत्सवात सौर ऊर्जेने चालणारी कार आकर्षणाचे केंद्र बनली आहे. याशिवाय ऑटोमेटीक डोसा मेकिंग मशीन आणि तांत्रिक संयत्र अनेकांचे लक्ष वेधत आहे. व्हीलचेयरला कसे स्ट्रेचरमध्ये बदलायचे हे सुद्धा महोत्सवात पाहायला मिळणार. अनेक जागी आग लागल्यानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी पाण्याचा उपयोग करण्यात येत नाही. या ठिकाणी आगीला विझविण्यासाठी वर्तुळांचा उपयोग करता येऊ शकतो. हे एक मॉडेल या तंत्रावर आधारित आहे. अनेकदा आपण गाडीत पेट्रोल टाकताना पंपाच्या मीटरकडे पाहतो. मात्र, खऱ्या अर्थाने गाडीत किती पेट्रोल आहे हे पाहण्याचे उपकरणही आपल्याला महोत्सवात पाहता येणार. सामान्य नागरिकांसाठी महोत्सव 15 फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार. महोत्सव प्रवेश निःशुल्क आहे.